**जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत कामांना / योजनांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्र.डिएपी-१०२६/प्र.क्र.१९६/ जिनिस-१ (ई- १७६२४१२)**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ५ ऑक्टोबर, २०२६.

**वाचा** - नियोजन विभाग, पत्र क्र.डिएपी-१०२६/प्र.क्र.१९६/का.१४८१, दिनांक ३० जुलै, २०२६

**प्रस्तावना**

नियोजन विभागाच्या वाचा येथील पत्रान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत विविध कामांना / योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी दि.३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या विहित मुदतीत राज्यातील जिल्ह्यांमध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत कामांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही अद्यापही पुर्ण झालेली नाही. राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागांमध्ये पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्यात एल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत कामांना / योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय**

राज्यात एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती तसेच पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागांमध्ये पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणुकीची आदर्श आचारसंहिता या पार्श्वभूमीवर, वाचा येथील पत्रान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत विविध कामांना / योजनांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी दिनांक ३० सप्टेंबर, २०२६ पर्यंत देण्यात आलेली मुदतवाढ, शासन मान्यतेने दिनांक ३० नोव्हेंबर, २०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

**२.** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत खालील विविध कामे / योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही वरील वाढीव मुदतीत प्राधान्याने करावी.

| अ.क्र. | प्राधान्याने हाती घ्यावयाची कामे / योजना |
|---|---|
| १ | जलसंधारणाची कामे, नाला खोलीकरणाची कामे |
| २ | मृदसंधारणाची कामे |
| ३ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामे |
| ४ | शिवकालीन बंधाऱ्यांची दुरुस्ती |
| ५ | पाणीपुरवठा योजनांनजीक रिचार्ज शाफ्ट / जलस्रोत बळकटीकरणाची कामे |
| ६ | कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांना फळया टाकण्याची कामे |
| ७ | बंधाऱ्यांचे बळकटीकरण |
| ८ | शासकीय रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे येथील मूलभूत सुविधांची देखभाल, दुरुस्ती व अनुषंगिक बांधकामे (नवीन बांधकामे वगळून) |
| ९ | शासकीय निवासी शाळा, आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय महाविद्यालये येथील मूलभूत सुविधांची देखभाल, दुरुस्ती व अनुषंगिक बांधकामे (नवीन बांधकामे वगळून) |

| अ.क्र. | प्राधान्याने हाती घ्यावयाची कामे / योजना |
|---|---|
| १० | वैरण विकास योजनेंतर्गत कामे |
| ११ | कृषी व कृषी संलग्न कामे |
| १२ | ग्राम विद्युतीकरण व सौर ऊर्जेवर आधारित विद्युतीकरणाची कामे |
| १३ | स्मशानभूमी दुरुस्तीची कामे |

**३.** राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, ज्या कामांमध्ये पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो अशा कामांना या वाढीव कालावधीत प्रशासकीय मान्यता देण्यात येऊ नये. यामध्ये प्रामुख्याने काँक्रीट रस्ते, सांडपाणी निचरा करण्यासाठी गटारे इत्यादी कामांचा समावेश आहे.

**४.** वरीलप्रमाणे दिलेल्या सूचनांनुसार जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२६-२७ अंतर्गत कामांना / योजनांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी विहित कार्यपद्धतीनुसार करावी.

**५.** या शासन परिपत्रकानुसार प्रशासकीय मान्यता देताना प्रचलित शासन निर्णय, शासन परिपत्रके, वित्तीय नियम, तांत्रिक मानदंड तसेच उपलब्ध तरतुदी यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

**६.** राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागांमध्ये पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. आदर्श आचारसंहितेच्या कोणत्याही तरतुदीचा भंग होणार नाही, याची सर्व संबंधित विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, सक्षम प्राधिकारी आणि कार्यान्वयीन यंत्रणा यांनी दक्षता घ्यावी.

**७.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१००५१७४३४४२४१६ आहे. प्रस्तुत शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJESH AGGARWAL
Date: 2026.10.05 18:07:56 +05'30'

**(राजेश अग्रवाल)**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे प्रधान सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.उप मुख्यमंत्री (उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मंत्री / राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.
८. विभागीय आयुक्त, (सर्व).
९. जिल्हाधिकारी, (सर्व).
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व).
११. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी आयुक्तालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.
१२. सह आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय, (सर्व).
१३. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, (सर्व).
१४. नियोजन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव.
१५. निवड नस्ती, का.जिल्हा नियोजन समिती-१, नियोजन विभाग.